# प्रकरण ७ संरक्षणाच्या दुय्यम संघटना

युद्धकाळात देशाच्या भू-सीमा, हवाई व सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी स्थलसेना, वायुसेना आणि नौसेना असतात. त्या शत्रूशी लढतात. त्यांना आघाडीवरील सेनादले असे म्हणतात. या सेनादलांच्या जबाबदारी व्यतिरिक्त युद्धकाळात देशाची अंतर्गत सुरक्षा सांभाळून सेनादलांना सहकार्य करणाऱ्या दलांना संरक्षणाची दुय्यम सेनादले असे म्हणतात. ही सेनादले केंद्रीय गृहमंत्रालय व संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असतात.

संरक्षणाची दुय्यम सेनादले शांतता काळात, युद्धकाळात व अंतर्गत अशांततेच्या काळात देशांतर्गत असलेले शस्त्रास्त्र कारखाने, वीजपुरवठा केंद्रे, विमानतळे, रेल्वेस्थानके, पेट्रोल व तेलसाठे, पाणीपुरवठा केंद्रे, बंदरे महत्त्वाची ठिकाणे यांचे रक्षण करतात. यासोबत खालील कामे करतात.

## दुय्यम सेनादलाची कामे

- देशांतर्गत सुव्यवस्था निर्माण करणे.
- नागरी प्रशासनास मदत करून स्थिरता निर्माण करणे.
- समुद्रकिनाऱ्याचे रक्षण करणे.
- शांतताकाळात सीमांचे रक्षण करणे.
- युद्धकाळात महत्त्वाचे रस्ते, पूल आणि महत्त्वाची ठिकाणे यांचे रक्षण करणे इत्यादी.

संरक्षणाच्या दुय्यम संघटनांमध्ये अनेक सेनादलांचा समावेश होतो. केंद्रीय गृह मंत्रालयाखाली असलेली दले यांना केंद्रीय सशस्त्र पोलीस दले असे म्हणतात. यात प्रामुख्याने सीमा सुरक्षा दल, इंडो तिबेट सीमा पोलीस दल, आणि आसाम रायफल यांचा समावेश होतो. तर भारतीय नौदलाच्या नियंत्रणाखाली तट रक्षक दलाचा समावेश होतो.

### अ) सीमा सुरक्षा दल :

सीमा सुरक्षा दलाची स्थापना १ डिसेंबर १९६५ रोजी झाली. या सेनादलावर केंद्रीय गृहखात्याचे नियंत्रण असते. सीमा सुरक्षा दलाच्या प्रमुखाचा हुद्दा 'महानिदेशक सीमा सुरक्षा दल' असतो. स्थलसेनेप्रमाणे या सुरक्षा दलाच्या अनेक तुकड्या (बटालियन्स) आहेत. सीमा सुरक्षा दल प्रामुख्याने शांतताकाळात भारत-पाकिस्तान व भारत-बांग्लादेश सीमा रक्षणाचे कार्य करते.

**कार्य :**

१) शांतता काळात देशाच्या भू-सीमांचे रक्षण करणे.

२) भारतीय सीमांचे उल्लंघन करणाऱ्या घुसखोरांचा व तस्करांचा बंदोबस्त करणे.

३) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने नागरी प्रशासनास मदत करणे.

४) सीमेपलीकडून घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना अटकाव करणे इत्यादी.

**ब) भारत तिबेट सीमा पोलीस दल :** भारताच्या उत्तर सीमेच्या रक्षणासाठी भारत तिबेट सीमा पोलीस दलाची २४ ऑक्टोबर १९६२ रोजी स्थापना करण्यात आली. हे सीमा पोलीस दल गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करते. या दलातील सैनिक काराकोरम पर्वतापासून जम्मू काश्मीरमधील लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या पर्वतीय सीमा प्रदेशात कार्य करतात.



**मुख्य कामे :**

१) सीमा व सीमा प्रदेशांचे रक्षण करणे.

२) सीमा प्रदेशातील निवडक प्रवेश मार्गावर (खिंडीवर) पहारा देणे.

३) सीमा प्रदेशातून बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्यांवर, गुन्हेगारांवर व बेकायदा वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणे इत्यादी.

**क) आसाम रायफल्स :** आसाम रायफल्स हे सर्वात जुने निमलष्करी सेनादल आहे. त्याची स्थापना १८३५ मध्ये कच्चारलेव्ही म्हणून करण्यात आली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात चांगली कामगिरी केली म्हणून या सेना दलाचा गौरव करण्यात आला. त्या वेळेपासून या सेना दलास आसाम रायफल्स म्हणून ओळखण्यात येत आहे. या सेनादलाचे मुख्य कार्यालय शिलाँग येथे आहे.




**कार्य :**

१) भारताच्या ईशान्य सीमेची सुरक्षा करणे.

२) ईशान्य भारतातील राज्यांमधील बंडखोरीविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करणे.

३) नागरी असंतोष नियंत्रित करून नागरी प्रशासनास मदत करणे.

४) ईशान्येकडील राज्यांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत करणे इत्यादी.

**ड) तट रक्षक दल :** तट रक्षक दल हे सागरी सुरक्षा सांभाळणारे नौसेना, मासेमारी व महसूल मंत्रालयाशी संलग्न कामे करणारे बहुकर्मी निमलष्करी सेनादल आहे. या सेनादलाची सुरुवात १ फेब्रुवारी १९७७ रोजी झाली व कायमस्वरूपी संघटनेची स्थापना १८ ऑगस्ट १९७८ रोजी झाली. तट रक्षक दलाच्या प्रमुखाचा हुद्दा 'महानिदेशक तट रक्षक दल' असतो. या दलाचा कारभार संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली चालतो. तट रक्षक दलाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे.




**कार्य :**

(१) तट रक्षक दलाचे मुख्य काम हे भारताच्या अंदाजे २० दशलक्ष चौरस किमी सागरी क्षेत्र व अंदाजे ७००० किमी लांबीच्या समुद्रकिनाऱ्याचे रक्षण करणे आहे.

(२) सागरी तस्करी व चाचेगिरीवर नियंत्रण ठेवणे.

(३) भारतीय मत्स्यव्यवसायास संरक्षण देणे व मदत करणे.

(४) भारताच्या समुद्र किनाऱ्यावर व सागरी पर्यावरणावर नियंत्रण ठेवणे.

(५) सागरी संपत्तीचे रक्षण करणे.

(६) सागरी विज्ञान व संशोधनासाठी उपयुक्त माहितीचे संकलन करणे इत्यादी.

## उपक्रम

१. तट रक्षक दल व सीमा सुरक्षा दल यांच्या कार्यांमधील फरक लिहा.

२. निमलष्करी दलाच्या सैनिकाची मुलाखत. (खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.)

अ) सैनिकाचे नाव :

ब) सध्या कार्यरत कार्यालय :

क) नेमणूक कधी झाली? :

ड) पात्रता काय लागते? :

इ) सैन्यात का जावेसे वाटले?

ई) सेवा काळातील उल्लेखनीय कामगिरी सांगा.

ज) अविस्मरणीय प्रसंग सांगा.

झ) संदेश

३. भारत-तिबेट सीमा पोलीस दल आणि आसाम रायफल्स यांच्या कार्यातील फरक लिहा.

४. भूमिका अभिनय : (वर्गातील मुलांचे चार गट पाडून दुय्यम सेनादलांच्या कामाचे सादरीकरण) तुमच्या भूमिकेतील अनुभव लिहा.

7XJA7Y

## उपक्रम

भारत-तिबेट सीमा पोलीस दल आणि आसाम रायफल्स यांची कार्यक्षेत्रे भारताच्या आराखड्यात दाखवा.

